# बृहन्मुंबई महानगरपालिका

क्र.सआजीद/ओडी/१७६/अनुज्ञापन (अति.निर्मु.)/दि.०५.०१.२०२४

## जाहिर सुचना

**विषय** – अनधिकृत फेरीवाल्यांवर निष्कासनाची कारवाई करण्याकरीता कंत्राटी कामगार अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) मार्फत पुरवठा करण्याबाबतची जाहिर सुचना.

सदर जाहिर सुचनेमार्फेत सर्व अशासकीय संस्थांना कळविण्यात येते की, जी/दक्षिण विभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात असणाया इच्छुक धर्मदाय आयुक्त व बृहन्मुंबई महानगरपालिकेत नोंदणीकृत असलेल्या स्थानिक अशासकीय संस्था, मंजुर सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा सहकरी संस्था, औदयोगिक सेवा सहकारी संस्था या संस्थांकडून माहे जानेवारी २०२४ ते मार्च २०२४ या कालावधीकरीता अतिक्रमण निर्मुलन वाहनावर एकुण १५ कंत्राटी कामगार पुरविण्याकरीता मोहरबंद इच्छापत्र मागविण्यात येत आहेत.

सदर इच्छापत्राचा नमुना वरिष्ठ निरीक्षक अनुज्ञापन (अतिक्रमण निर्मुलन), बृहन्मुंबई महानगरपालिका जी/दक्षिण विभाग कार्यालय, रुम नं.१७, दुसरा मजला, ना.म.जोशी मार्ग, धनमिल नाका, लोअर परेल, मुंबई ४०००१३ येथे रुपये ६०० /- अधिक १८% वस्तु व सेवा कर असे एकूण रुपये ७०८/- आकारून (ना-परतावा) रोख स्वरुपात चलन काढून दि.**०६.०१.२०२४** ते दि.**१२.०१.२०२४** या दिवशी सकाळी १०.३० ते दुपारी ०१.०० वाजेपर्यंत विकत घेउु शकतात तसेच आवश्यक कागदपत्रांसहित सिलबंद अर्ज दि.**१२.०१.२०२४** पर्यंत दुपारी ०१.०० वाजेपर्यंत अनुज्ञापन खाते, जी/दक्षिण विभाग, दुसरा मजला येथे सिलबंद पेटीत टाकावे. नमुद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर प्राप्त अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

लॉटरीची तारीख दि.**१५.०१.२०२४** रोजी दुपारी ०३.०० वाजता निश्चित करण्यात आलेली आहे.

सही/-

**सहाय्यक आयुक्त जी/दक्षिण विभाग**